आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.com




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ०७ वे ● अंक २५० वा ● शनिवार दि. १७ फेब्रुवारी २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

### इतर समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण मराठा समाजाला मिळेल – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विश्वास

मुंबई : राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांनी मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी राज्यभरात घेण्यात आलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आज सुपूर्द केला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. वर्षा निवासस्थानी आज सकाळी हा अहवाल सुपूर्द करतेवेळी आयोगाचे सदस्यदेखील उपस्थित होते. यावेळी आयोगासह संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा अशा साडेतीन ते चार लाख अधिकारी, कर्मचाऱ्यांनी विक्रमी वेळेत सर्वेक्षण केल्याबद्धल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचे कौतुक केले. या सर्वेक्षणाबाबत मुख्यमंत्र्यांनी बैठका घेऊन युद्ध पातळीवर हे सर्वेक्षण पूर्ण करण्याच्या सुचना दिल्या होत्या. मराठा समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगामार्फत २३ जानेवारीपासून राज्यात युद्धपातळीवर मराठा व खुल्या प्रवर्गाचे सर्वेक्षण करण्यात आले.

### महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या 'महा ऐज' उपक्रमाचा शुभारंभ

मुंबई, : सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य



विभागाच्या अंतर्गत असलेल्या महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाने (MPBCDC) मुंबई येथे २० नामवंत संस्थासमवेत महत्वपूर्ण सामंजस्य करार केले आहेत. यामुळे राज्यात कौशल्य प्रशिक्षणातून येणाऱ्या तीन वर्षात २ लाख रोजगार आणि स्वयंरोजगार निर्माण होणार असून महा ऐज (M-H--EDGE) महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा शुभारंभ केला आहे.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत 'महा ऐज' (उद्योजकता विकास आणि रोजगार वाढ) (M-H--EDGE) (Entrepreneurship Development and Growth in Employment) उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे आणि महाप्रीतचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अमोल शिंदे, यांच्यासह या क्षेत्रातील कौशल्य परिषद, विद्यापीठे, उष्मायन केंद्रांचे २० हुन अधिक प्रतिनिधी उपस्थित होते.

'महा ऐज' हा महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ आणि 'महाप्रित' चा एक संयुक्त उपक्रम आहे. ज्या अंतर्गत लक्ष्यित समुदायातील दोन लाख लाभार्थ्यांना रोजगार आणि स्वयंरोजगार निर्माण करण्यासाठी आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण देण्याचे उदिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यापैकी १.५ लाख लोकांना विविध कौशल्य प्रशिक्षण दिले जाईल. त्यामुळे त्यांना रोजगार मिळण्यास मदत होणार आहे. या उपक्रमाअंतर्गत ५० हजार लाभार्थ्यांना राज्यात उद्योजकता विकास कार्यक्रमाद्वारे प्रशिक्षित करण्याची योजना आखली आहे, ज्याचा उद्देश नवीन युगाच्या क्षेत्रात १०० हून अधिक स्टार्टअप्स तयार करणे हा आहे. केंद्र सरकार आणि सामाजिक न्याय विभाग समाजातील सर्व घटकांच्या सर्वसमावेशक प्रगतीसाठी कटिबद्ध असून 'महा ऐज' हा उपक्रम तरुणांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या माध्यमातून उपजीविका मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांवर परिणाम करेल, असा विश्वास सामाजिक न्याय विभागाचे सचिव श्री. भांगे यांनी यावेळी व्यक्त केला. सचिव श्री. भांगे म्हणाले की, अनुसूचित जातीतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांच्या उन्नतीसाठी काम करण्यासाठी महामंडळ आणि 'महाप्रित' सोबत सहकार्य करण्यासाठी सर्व सेक्टर स्किल कौन्सिल (SSC) यांचा समावेश करण्यात आला असून या कार्यक्रमासाठी केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाने निधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्यांनी आभार मानून केंद्र सरकारच्या पीएम अजय योजनेअंतर्गत २० हजार लाभार्थ्यांना पहिल्या ट्प्यात प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली शासनाने शासन आपल्या दारी सारखे विविध उपक्रम हाती घेतले आहेत. महा ऐज उपक्रमांद्वारे युवकांवर अधिक लक्ष केंद्रित करून त्यांच्यासाठी अधिक रोजगाराच्या संधी निर्माण करेल, अशी माहिती महामंडळाचे आणि महाप्रीतचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. शिंदे यानी यावेळी दिली. महामंडळाच्या माध्यमातून राज्यभरातील विद्यापीठे आणि उष्मायन केंद्रांच्या सहकार्याने या कार्यक्रमातून निवडलेल्या स्टार्टअप्सना त्यांचे उपक्रम तयार करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. असेही श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले, महामंडळाने त्या दिशेने आधीच एक पाऊल टाकले आहे आणि नाविन्यपूर्ण व्यवसाय कल्पना आणि इच्छुक उद्योजकांसाठी एक आधार म्हणून काम करण्यासाठी, अत्याधुनिक पायाभूत सुविधा आणि अत्यावश्यक सुविधांनी सुसज्ञ असलेल्या नागपुरात नव्याने सुरू झालेल्या सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडिया (STPI) इनक्युबेशन सुविधेसोबत सहकार्य केले आहे. महामंडळाचे ५० नवोदित उद्योजकांना त्यांच्या स्टार्ट–अप्सची भरभराट करण्यासाठी सक्षमपणे त्यांच्या पाठीमागे उभे असल्याचे श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमादरम्यान महामंडळाने २० हून अधिक सेक्टर स्किल कौन्सिल (SSC) सह सामंजस्य करार केले. त्यामध्ये प्रामुख्याने अपोलो मेडस्कील्स सारख्या नामवंत संस्थांचा समावेश आहे. विज्ञान तंत्रज्ञान उद्यान, पुणे आणि गोंडवाना विद्यापीठ यांच्याशी महा ऐज उपक्रमाच्या अंमलबजावणीस सहकार्य करण्यासाठी सामंजस्य करारांवर यावेळी स्वाक्षरी करण्यात आल्या. या उपक्रमाची महामंडळाच्या mpbcdc.in and nbrmahapreit.in या संकेतस्थळावर नोंदणी करण्यात येत आहे. यावेळी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक प्रशांत गेडाम, निवृत्त सह सचिव दिनेश डिंगळे, राज्यातील विविध विद्यापीठ, विविध बँका, सामाजिक न्याय विभाग व महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## गुन्हा अन्वेशन विभागाचे कार्य कौतूकास्पद, लातूरातील अवैध दारु विक्री-मटका धंद्याचे काय ?

लातूर (दैलाप्रप्र) : जिल्हा पोलीस अधिक्षक सोमय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर गून्हा अन्वेशन शाखेचे कार्य कौतूकास्पद आहे. जिल्हाभरात शोधमोहीम सुरु करुन दुचाकी मोटार सायकली, चोरासह जप्त करुन चोरट्याना जेरबंद केले जात असल्याने दुचाकी वहानधारकाला समाधान व्यक्त होते आहे. त्यातच गुन्हा अन्वेशन विभागाचे कौतूकही होते आहे.

वहान चोरी बरोबरच लातूर शहर व जिल्हाभरात अवैद्य मटका, अवैद्य देशी दारु विक्री होते. लातूर शहरात तर गल्ली बोळात सर्रास देशी दारु विक्री केली जाते, अवैद्य मटका खेळला खेळविला जातो याकडे पोलीसाचे दुर्लक्ष कसे काय होते. प्रत्येक भागात जमादार तैनात असतात पोलीसाची गस्त असते, पंरतू मटका आणी देशीदारु अवैद्य रित्या विक्री होते ते निदर्शनास येत नाही काय ? पोलीस अधिक्षक सोमय मुंडे हे फक्त गुन्हा अन्वेशन विभागासच मार्गदर्शन करतात मग लातूर शहरातील गांधी चौक, शिवाजीनगर, विवेकानंद चौक, ग्रामीण, एमआयडीसी पोलीस ठाणे निरिक्षक आणी




कर्मचाऱ्याना मोकळे सोडले आहे काय अशी ही कुजबूज होताना दिसते आहे. गुन्हा अन्वेशन विभाग कार्यरत आहे, ते गुन्हे उघडकीस आणीत आहेत. चोरीचा माल व गुन्हेगाराना अटक करीत आहेत मग पोलीस ठाण्यातील अधिकारी, कर्मचाऱ्याचे काय काम अशी ही शंका व्यक्त होत असून ते अवैद्य मटका, देशी दारु विक्रेत्याकडून हप्ता वसूली करतात काय अशी ही शंका लोक व्यक्त करीत असताना दिसतात.

विशेष म्हणजे सरकारमान्य कार्ड रुम मध्ये करमणूकीच्या नावावर अवैद्य तिरट जूगार खेळला, खेळविला जातो आहे. त्यास संबंधीत भागातील पोलीसांचे अभय असल्याचे बोलले जात असून याकडे पोलीस अधिक्षकाचे दुर्लक्ष्य कसे काय अशी ही कुजबूज होताना दिसते आहे. लातूर शहरासह जिल्हाभरात घरफोड्या, खून-मारामारी असे प्रकार होत आहेत पण त्याचा तपास लागत नाही. केवळ गुन्हा अन्वेशन विभागच दुचाकी वहाने व ती चोरणारी टोळी जेरबंद करीत आहेत पण लातूर शहरातील अवैद्य प्रवासी वाहतूक, ॲटोरिक्षा चालकाची बेशिस्त वर्तूणुक याकडे वाहतूक शाखेचे दुर्लक्ष्य कसे अशीही कुजबूज होताना दिसते आहे.

कायदा वसुव्यवस्थेच्या दृष्टीने अवैद्य धंदे, मटका, जूगार, तंटे, बखेडेवर पाबंदी असायला हवी पंरतू सर्रासपणे लातूर शहरातील गल्ली बोळात अवैद्य देशी दारु विक्री मटका जूगार खेळला जातो आहे. त्यावर मेहरनजर कोणाची कशासाठी असावी याची चौकशी पोलीस अधिक्षक सोमय मुंडे यानी करुन संबंधीत पोलीस ठाण्याच्या अधिकारी, कर्मचारी वर्गाची झाडाझडती घ्यावी अशी मागणी होते आहे.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी दोन दिवस राखीव

**मुंबई, : वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय,दंत महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी विशेष उपाययोजना राबविण्यात येणार असल्याचे वैद्यकीय शिक्षण, विशेष सहाय्य मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले.**

मंत्री श्री. मुश्रीफ म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ नागरिकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत बैठक झाली. बैठकीमध्ये राज्यातील सर्व ज्येष्ठ नागरिकांना सर्वंकष आरोग्य सुविधा पुरविण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. या अनुषंगाने वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे आयुक्त यांनीही सर्व शासकीय अधिष्ठातांना अंमलबजावणी करण्याच्या सूचना



दिलेल्या आहेत.यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अख्यत्यारितील सर्व वैद्यकीय, दंत, अतिविशेषोपचार महाविद्यालये रुग्णालयांमार्फत ६० वर्षावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांची वर्षातून दोन वेळस मोफत आरोग्य चाचणी, तपासणी करण्यात यावी. ही आरोग्य तपासणीची नोंद आभा कार्ड, एच. एम. आय. एस. प्रणालीमध्ये घेतली जाईल.

ज्येष्ठ नागरिकांनी राज्यातील १.५० कोटी संख्या विचारात घेता सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या तपासणीसाठी डॉक्टर व संबंधित चाचणी, तपासण्यांकरीता आठवड्यातील दोन दिवस राखीव ठेवण्यात येतील. सर्व ज्येष्ठ नागरिकांच्या वैद्यकीय तपासणीत दुर्दैवाने काही आजार आढळून आल्यास त्यावर महात्मा फुले जनआरोग्य योजनेच्या अटी व शर्ती अनुसार उपचार करण्यात यावेत,

सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात ज्येष्ठ नागरिकांना आभा कार्ड उपलब्ध करुन देण्याची सुविधा असावी. अशा सूचना देण्यात आल्या असल्याचे मंत्री श्री. मुश्रीफ यांनी सांगितले.

### पुनर्वसनाचे राखीव शेरे कमी करण्याच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना लाभ

मुंबई, :– पुणे जिल्ह्यातील चासकमान प्रकल्प, कुकडी व डिंभे प्रकल्प, भामा आसखेड प्रकल्प, निरा देवधर प्रकल्प, गुंजवणी प्रकल्प, आरळा कळमोडी प्रकल्प आणि बोपगाव रायता पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनींच्या ७/१२ उताऱ्यावरील इतर अधिकारातील पुनर्वसनाचे राखीव शेरे कमी करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे. पुनर्वसनाचे राखीव शेरे कमी करणे या निर्णयामुळे या शेतकऱ्यांना पीक कर्जासह, त्यांच्या जमिनींचे खरेदी – विक्री व्यवहार करणे सुलभ होणार असून अन्य शेतीविषयक योजनांचा लाभ घेता येईल, अशी माहिती मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील यांनी दिली.

### लोकाभिमूख प्रशासन राबविण्यासाठी क्रीडा स्पर्धा महत्त्वपूर्ण - विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय

अमरावती, : शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी नियमितपणे विविध क्रीडा स्पर्धा झाल्या पाहिजेत, अशा स्पर्धांच्या माध्यमातून अधिकारी व कर्मचाऱ्यांत सांघिक भावना निर्माण होते. स्पर्धांच्या आयोजनातून अधिकारी–कर्मचाऱ्यांचा दैनंदिन प्रशासकीय कामाचा तणाव दूर सारल्या जावून नवचैतन्याने लोकाभिमूख प्रशासन राबविण्यास सहाय्यता होते, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी आज येथे केले. विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा उत्साहाने व दर्जेदारपणे पार पडतील, असा आशावाद व्यक्त करुन स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विभागीय आयुक्तांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

येथील विभागीय क्रीडा संकुलात आयोजित विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२३–२०२४ चे दिप प्रज्वलन व क्रीडा मशाल पेटवून विभागीय आयुक्तांच्या हस्ते थाटात उद्घाटन करण्यात आले. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या.

या स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमाला जिल्हाधिकारी सौरभ कटियार, विशेष पोलीस महानिरीक्षक आर.एल. पोकळे, जिल्हा पोलीस अधिक्षक विशाल आनंद, महापालिका आयुक्त देविदास पवार, अपर जिल्हाधिकारी सुरज वाघमारे, उपायुक्त संजय पवार, गजेंद्र बावणे, रमेश आडे, संतोष कवडे, हर्षल चौधरी, प्रबोधिनीचे संचालक अजय लहाने, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, सहाय्यक आयुक्त श्यामकांत मस्के, राजू फडके, वैशाली पाथरे, क्रीडा व युवक सेवा विभागाचे उपसंचालक विजय संतान यांच्यासह विभागातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, जिल्हा क्रीडा अधिकारी व पाचही जिल्ह्यातील महसूल अधिकारी–कर्मचारी आदी यावेळी उपस्थित होते.

## पत्रकारांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी समिती गठित करण्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

कोल्हापूर, (जिमाका) : पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ




आहेत. कोणत्याही प्रश्नाला, समस्येला वाचा फोडण्याबरोबरच समाजाला आरसा दाखवण्याचे महत्त्वपूर्ण काम पत्रकार करतात. पत्रकारांनी मागणी केलेले प्रश्न मार्गी लावण्यात येतील, पत्रकार सन्मान योजनेचा लाभ मिळवून देण्याची प्रक्रिया सुलभ होण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर समिती गठित करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिली. शासन चालवित असताना माध्यमातील अनेक बातम्यांमधून वेगवेगळ्या चुका लक्षात येतात व त्या चुका दुरूस्त करून अधिक चांगल्या पध्दतीने काम करता येत, असे प्रतिपादनही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोल्हापूर येथे केले.

कोल्हापूर प्रेसक्लबच्या वतीने आयोजित वार्षिक पुरस्कार वितरण सोहळा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत केशवराव भोसले नाट्यगृहात पार पडला. या कार्यक्रमाला राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, खासदार संजय मंडलिक, खासदार धैर्यशील माने, आमदार प्रकाश आबिटकर, आमदार राजेंद्र पाटील –यड्रावकर, प्रेस क्लबचे अध्यक्ष शीतल धनवडे, उपाध्यक्ष प्रशांत आयरेकर, कार्याध्यक्ष दिलीप भिसे, कोल्हापूर विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष सुखदेव गिरी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार, फोटोग्राफर, कॅमेरामन आदी उपस्थित होते.

उत्कृष्ट काम करणाऱ्या पत्रकार, छायाचित्रकार, कॅमेरामन व अन्य मान्यवरांचा मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, शेतकरी, कष्टकरी, महिला यांच्यासह सर्वसामान्यांना न्याय देणारे हे सरकार आहे. कोरोनाकाळात पत्रकारांनी जीव धोक्यात घालून काम केले. कोरोना, पूरपरिस्थितीसह राज्यात आजवर आलेल्या अनेक संकटकालीन परिस्थितीत पत्रकारांनी खूप चांगले काम करुन आदर्श निर्माण केला आहे. पत्रकारांसाठी आम्ही कोरोनाकाळात तपासणीचे विशेष शिबीरांचे आयोजन केले होते. पत्रकार चौकस बुध्दीने, जागृत राहून समाजाला योग्य दिशा दाखवण्याचे काम करतात. सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम पत्रकारांनी केले आहे. शासनाच्या उणिवा दाखवतानाच समाजातील सर्वसामान्यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी त्या त्या ठिकाणची चांगली कामे, महत्त्वाकांक्षी प्रकल्प याचेही लेखन, चित्रण पत्रकारांनी करुन ते समाजासमोर आणावे, अशी अपेक्षा मुख्यमंत्री श्री शिंदे यांनी केली. पत्रकारांच्या घरकुल योजनेसाठीचा टॅक्स कमी करण्याबाबत म्हाडाच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा करण्यात येईल. तसेच कोल्हापुरात पत्रकार भवन उभारण्यासाठी जागेचा प्रश्न मार्गी लागण्यासाठी महानगरपालिका आयुक्त यांच्याशी चर्चा करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

राजेश क्षीरसागर म्हणाले, कोल्हापूर मध्ये आजवर आलेल्या पूर परिस्थिती तसेच अन्य आपत्कालीन परिस्थितीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्या–त्या वेळी मदतीला धावून येत सहकार्याची भूमिका बजावली आहे, त्यांच्या पुढाकारानेच कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील पूर परिस्थिती नियंत्रणासाठी कायमस्वरुपी उपाययोजनांसाठीचा निधी जागतिक बँकेकडून मिळणार आहे. प्रेस क्लबचे अध्यक्ष शीतल धनवडे, उपाध्यक्ष प्रशांत आयरेकर व कोल्हापूर विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष सुखदेव गिरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मुख्यमंत्री व मान्यवरांचे स्वागत कोल्हापूर जिल्ह्याचे प्रेस क्लबचे अध्यक्ष शीतल धनवडे व उपाध्यक्ष प्रशांत आयरेकर यांनी केले. आभार प्रेस क्लबचे खजानिस बाबुराव रानगे यांनी मानले. सूत्रसंचालन पत्रकार समीर देशपांडे यांनी केले. मुख्यमंत्री कक्षात काम करणारे व कोल्हापूर जिल्ह्यात पुर्वी पत्रकारिता केलेले अमित हुक्केरीकर आणि प्रशांत साळोखे यांचा सन्मान प्रेस क्लबमार्फत करण्यात आला. याचबरोबर पत्रकार समीर देशपांडे यांचा सन्मान १२ वर्ष विविध क्षेत्रातील **(पान ३ वर)**...

## भाजपच्या ''गाव चलो अभियान''ला उत्स्फूर्त प्रतिसाद.. आमदार अभिमन्यू पवार मातोळा व आशीव मुक्कामी....

**औसा – २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाने पक्षाची विकासाची दृष्टी गरीबांच्या कल्याणाकडे घेऊन आणि सरकारने केलेली विकासकामे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवून जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी गाव चलो अभियान सुरू केले आहे. या अभियानातंर्गत आमदार अभिमन्यू पवार यांनी मतदारसंघातील मातोळा व आशीव याठिकाणी मुक्काम केला या अभियानाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांनी लाभार्थींची भेट घेत त्यांना मिळालेल्या योजनांची माहिती घेतली; तर केवायसी व इतर तांत्रिक कारणामुळे लाभ न घेऊ शकलेल्या नागरिकांनी त्याची पूर्तता करून योजनेंचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. विद्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, अंगणवाडी, महिला बचत गट, ग्रामपंचायत कार्यालय यांना सदिच्छा भेट देत पाहणी केली. तसेच महत्त्वाच्या गरजांना कायम सहकार्य करण्याचे त्यांनी आश्वासित केले.**

या अभियानाअंतर्गत मातोळा येथे माणिक आंनदगावकर,रमेश भोसले,गिरीश भोसले,बबन



भोसले,नितीन जाधव ,दत्ता भोसले यांच्या निवासस्थानी तर जिल्हा परिषद शाळा, श्री माधवराव भोसले हायस्कुल मातोळा दलित वस्ती, वडार वस्ती, खंडोबा मंदिर समोर सभा मंडप आदी ठिकाणी भेटी दिल्या. तसेच आशीव येथे गोविंद जगताप, गोरख राठोड, प्रविण वाघे, महादेव जाधव, विनायक चव्हाण, भिमाशंकर लखादिवे, बी. के. माने, भिमाशंकर बंडगर, रसुल शेख, हिराचंद लाड, श्रीनिवास मदने, सिद्धेश्वर कुंभारे, नामदेव काकडे,

आण्णा मोरे ,राजाराम भुरे,बाळाप्पा वाले,प्रदीप भोसले,जिकराईल शेख ,दादासाहेब मोरे,भागवत शिंदे, सुंदर गोरे,किसनराव गोरे,सचिन कुटकर,निशांत भोसले,व्यंकट नाना भोसले,दत्तात्रय

दिगंबर काकडे, विनोद जगताप तसेच घरकुल योजना लाभार्थी शाहूराज कांबळे व गोरख आयवळे यांच्या निवासस्थानी भेटी दिल्या. या वेळी आमदार अभिमन्यू पवार यांनी नवमतदार, ज्येष्ठ कार्यकर्ते, समाजातील प्रतिभावंत व्यक्ती तसेच खेळाडूंचीही त्यांनी भेट घेतली व त्यांचा सत्कारही केला. तसेच गावात फिरून त्यांनी लोकांशी संवाद साधला.

उत्तम संघटनात्मक बांधणी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारचे १० वर्षांतील प्रभावी कार्य, जाहीरनाम्यातील आश्वासनांची केलेली पूर्ती, विकसित भारताचा संकल्प सांगणाऱ्या यंदाच्या अंतरिम अर्थसंकल्पातील ठळक तरतुदी ही सर्व माहिती 'गाव चलो अभियान'मधून लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम करण्यात येत आहे. 'गाव चलो' अभियानात आमदार अभिमन्यू पवार यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत मोदी की गॅरंटीचा नारा पोहचविला. गाव चलो अभियानात बूथ प्रमुखांशी बैठक घेतली , मतदार यादीमधील लोकांशी चर्चा केली , कार्यकर्त्यांशी संवाद साधला , नमो एपबाबत प्रचार केला , हॅन्ड बिल वाटप केले, संघाच्या वरिष्ठ मंडळींशी चर्चा केली, युवकांसाठी नमो चषकचे आयोजन,दिवार लेखन, सामाजिक संस्थांशी चर्चा असे एकूण १८ कार्यक्रम राबविले

## झरोका

एक – निवडणूक रोखे म्हणजे काय, केंद्र सरकारला झटका, राजकीय पक्षाची कोंडी वगैरे बातम्या आहेत निवडणूक आणी रोखे यातील भानगड काय तेचकळत नाही. डोकं बधीर झालं आहे.

दुसरा – अरे, पूर्वीपासूनच निवडणूक काळात, राजकीय पक्षाना काळा बाजार करणारे, उद्योजक, व्यापारी निनावी रक्कम देत असतात. त्यावरच सत्ताबाजार, लोकसभा, विधानसभा सदस्याची पळवापळवी, फोडाफोडी होत असते. जसे शिंदे, पवारानी केले तसेच समज. पण ते निवडणूक रोखे पध्दतच सर्वोच्च न्यायालयाने बंद केले असून त्याचा हिशोबच मागीतला आहे.

एक – अहो, राजकीय पक्षाना मदत लागतेच पण ती चोरुन कशासाठी द्यावी, आणी ती देणे बाबत सर्वोच्च न्यायालयाची बंदी म्हणजे काय ते कळत नाही.

दुसरा – अरे, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी २०१८ साली निवडणूक रोखे योजना कार्यान्वीत केली होती तिस आव्हाण देणारी याचीका सूनावणीला होती, तिच याचिका, त्यातील म्हणणे योग्य ठरवून निवडणूक रोखे योजनाच रद्द ठरवून मोदी सरकारला एक धक्काच दिला आणी उद्याची निवडणूक पारदर्शी होईल हीच भावना यातून प्रकट होते आहे दुसरे काय.

एक – अहो, मग सर्वच पक्षाला झटका बसला असेल मग मोदी सरकारलाच झटका कसा काय.

दुसरा – अरे, काँग्रेस मूक्त भारत, वटहूकूमी कारभार, एक राष्ट्र, एक निवडणूक, एक देश, एक पक्षअशा कोलांटउड्या, माकडउड्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मारीत होते ते अशा या आर्थीक मदतीच्या बळावरच होत्या म्हणूनच मोदी सरकारला झटका अशा ज्या बातम्या आहेत त्या केवळ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मनमानी, स्वार्थी, एकला चलो रे, भावनेलाच झटका आहे समजलं.

एक – अहो, मग प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विश्वगुरु होण्याच्या स्वप्नाचे काय.

दुसरा – अरे, काळजी करु नकोस, संसद नाही तर नवीन मंदीर उभारुन स्पप्न साकारता येईलच की त्यात काय अवघड आहे थोंड थांब.

## काय बोलता राव ?

कॉगसच्या एका कार्यकर्ती महिलेने, जया ठाकूर ने काय धमाल केली. चक्क प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याच निवडणूक रोखे योजनेला आव्हान देवून एक गड सर केला आणी लोकशाहीला वरदान दिले हे नसे थोडके अहो.

**काय बोलता राव,**

अरहे, अशा या निवडणूक रोख्याच्या पैशातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हेच भारतातील इतर राज्यातील सरकारे पाडण्यासाठीच न कळत वापर करीत असत. त्यामूळे महाराष्ट्रासारखे राज्य ही घायाळ झाले होते, आहे. कारण पैशापूढे सारेच शून्य ठरते. पण ही घातकी योजनाच नको म्हणून त्या जया ठाकूरने धाडसाने रोखे विरोधात याचिका दाखल केली आणी ॲड. कपिल सिब्बल यानी बाजू मांडली आणि सर्वोच्च न्यायालयाने ती निवडणूक रोखे योजनाच रद्दबातल करुन लोकशाहीला बळ दिले. आणी चक्क निवडणूक आयोगच ढसाढसा रडू लागला असेल आणी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची सिबीआय, ईडी ही आमचेही कधीतरी बारा वाजतील म्हणून चिंताग्रस्त बनले असतील तर त्यात नवल कसले बोला दाजीबा !

### अश्विन अघोर यांच्या रूपाने एक प्रखर राष्ट्रभक्त पत्रकार गमावला – सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार

चंद्रपूर / मुंबई , :– 'राष्ट्र प्रथम' हा विचार



प्रखरपणे मांडणारे पत्रकार अश्विन अघोर यांचे अकाली निधन धक्कादायक आणि दुःखद आहे. त्यांच्यारूपाने एक प्रखर राष्ट्रभक्त पत्रकार आपण गमावला आहे, अशा शब्दात सांस्कृतिक कार्य, वने व मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिवंगत पत्रकार अश्विन अघोर यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले आहे. ते पुढे म्हणाले की, त्यांच्या स्वभावात वैदर्भीय दिलखुलासपणा आणि मिश्किलपणा ठासून भरला होता. जीवनात यश मिळवतांना अनेक संकटांना त्यांनी खिलाडूपणे हसतमुखाने तोंड दिले. अनेक वृत्तपत्रे आणि न्यूज चॅनेल्समधील यशस्वी कारकीर्दीनंतर आपल्या 'घनघोर' या लोकप्रिय यूट्यूब चॅनेलवरून खऱ्या बातम्या आणि बातम्यांमागच्या सत्याचा शोध अव्याहतपणे मांडणाऱ्या अश्विनजींच्या अकाली जाण्याने तयार झालेली पोकळी दीर्घकाळ जाणवत राहील. आपल्या लिखाणातून आणि व्हीडियो वार्तापत्रातून मांडलेल्या विश्लेषणातून त्यांनी जनजागृतीचे मोठे कार्य सातत्याने केले. माध्यम क्षेत्रातील सद्य प्रलोभनांपासून दूर राहून वैचारिक पत्रकारितेचा एक आदर्श अश्विन अघोर यांनी उभा केला. राष्ट्रविरोधी नरेटिव्ह खोडून काढताना नवीन बदलत्या तंत्रज्ञानाचा अतिशय चांगला उपयोग त्यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात करून घेतला. पर्यावरण आणि जैवविविधतेचाही त्यांचा चांगला अभ्यास होता. ईश्वर त्यांना सद्गती देवो आणि त्यांच्या कुटुंबियांना तसेच मित्र परिवाराला या दुःखातून लवकर सावरण्याचे बळ देवो, असे सांगून मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी अश्विन अघोर यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे.

# रामराज्य कालचे आणि आजचे!

## संपादकीय...

राम राज्यापासूनच घटनाकारांना प्रेरणा असा शोधात्मक दावा भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या मन की बात मधून केला हे एकूण वाचून शहाण्याच्या खोपडीसह तन मनासह मानाखाली झुकल्या असतील आणि मोदी चेल्याची छाती चक्क मोठभराएवढी रुंदावली असेल त्या संदर्भात लिहिणे बोलणे उचित अनुचित वगैरे काही न ठरविता रामाच्या वंशावळीचा कार्य कर्तत्वाचा अभ्यास नसताना कल्पोकथीत रामायणावरुनर रामाची राम राज्याची प्रेरणा घेऊनच घटना करावी घटना लिहिली असे वक्तव्य भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी करतात तेही भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव न घेताच तसा दावा केल्याने एका भिकाऱ्यानेच प्रधानमंत्रीपदी शुद्र विचाराची व्यक्ती कोणी बसविली असा संतापजनक सवाल करून हातातील भिक्षापात्र फेकून देऊन आपणही नाराजी व्यक्त केल्याने राम राज्य कालचे आणि आजचे रामराज्य कोणते आणि कसले त्यातील एकता आणि दुरावा काय असावा म्हणून लिहिण्याचा हा खटाटोपच म्हणावा लागेल यात शंका नसावी.

आयोध्येतील राम मंदिरात एकाच कच्च्या पाषाणाच्या दगडात कोरलेल्या रामाच्या मूर्तीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्राण ओतला त्या दगडाच्या मूर्तीत जीव भरला– राम जिवंत झाला त्यावेळी भारतभरातील कोट्यावधी राम भक्त हजर होते ते सर्वजाती –धर्माचे होते हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा कयास असल्यानेच त्या समुदायाचा धागा पकडूनच भारतातील विविध जाती धर्माच्या लोकांना त्यांचे देव –धर्माचे अधिकार शाबूत ठेवून सामाजिक न्याय, लोकशाही, स्वातंत्र्य ,समानता, बंधुता न्याय व हक्काची भारतीय राज्यघटना देऊन समाजीक जातीय ऐक्य आणि राष्ट्रीय एकात्मता आबाधित ठेवणारी घटना– संविधान दिले ते दूरगामी– न्यायिक ,समानता ,सर्वधर्मसमभावाचे प्रतीक आहे पण विलक्षण– विपरीत तत्त्वाची सांगड घालून घटनाकारांनी राम राज्याची प्रेरणा घेऊनच संविधान निर्मलेअसा पुळचट हा दावा केला तो हास्यस्पद वाटतो अशीच प्रतिक्रिया सुज्ञ भाजपने त्यातून व्यक्त होताना दिसते आहे.

हे वास्तव नाकारता येत नाही परंतु प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बोले सारा– भारतीय समाजातील मान हलविली याशिवाय दुसरा पर्यायच असू शकत नाही परंतु रामाने कोणाचे राज्य कमविले आणि कोणाचे राज्य गमविले, राज्य हस्तगत करण्यासाठी कोणत्या राज्याविरुद्ध लढाई केली याचा इतिहास उपलब्ध नाही पण केवळ सिताहरनातून रामायण घडले एवढाच रामायण इतिहास असताना राम राजा झाला आणि रामराज्य आले वगैरे ठीक आहे पण राम राज्याच्या प्रेरणेतूनच घटनाकारांनी म्हणजेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना लिहिली असा दावा करणे उचित ठरणार नाही परंतु खुद प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीच दावा केल्याने ते मान्य करावेच लागेल परंतु तेच विधान काँग्रेसवाल्यांनी केले असते तर प्रधानमंत्री नरेंद्र मोदीच काय खुद केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीच देशद्रोहाचा दावा भरून काँग्रेस मुक्तीची नव्हे तर हद्दपारचीच आदेश वटहुकूम जारी केला असता अशीच कुजबूज राजकीय वर्तुळात होताना दिसते आहे ते नाकारून चालणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जातीचा विध्वंस हे एक भाषण प्रसिद्ध आहे ते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी वाचले नसले किंवा त्यांना ते कुणी राम प्राण प्रतिष्ठापनाप्रसंगी कुणी सांगितले नसेल हा भाग वेगळा पण बाबासाहेब म्हणतात काही लोक रामाला स्वैरपणे आणि विनाकारण शंबुकाची हत्या केल्याबद्दल दोष देताना दिसतात परंतु शंबुकाच्या हत्ते बद्दल रामाला दोष देणे म्हणजे त्या परिस्थितीचे चुकीचे अवलोकन करणे होय .रामराज्य हे चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर आधारित होते. राजा म्हणून रामाला चातुरवर्णाचे रक्षण करणे भाग होते. म्हणून स्वतःच्या विहित वर्गाचे उल्लंघन करून ब्राह्मण होण्याची इच्छा बाळगणाऱ्या शंबुकाचा वध करणे हे रामाचे कर्तव्य होते हेच रामाने शंबु काचा वध करण्याचे कारण होते. कारण चातुर्वणा तशी दंडाची शिक्षा होती. त्यासाठीच मनुस्मृति ने वेद वाचणाऱ्या किंवा ऐकणाऱ्या शुद्राची– शंबुकाची हत्या करणे– जीभ छाटणे किंवा कानात तापते शीशे ओतणे हे त्यांचा दंडक होता म्हणूनच आज घडीला चातुरवर्णे समाजाचे समर्थन करणारच मग आजच्या आधुनिक भारतात रामराज्य कसे प्रतीत होऊ शकते आणि स्वातंत्र्य भारताची घटना लिहिताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कसा आधार प्रेरणा घेतली याचा खुलासा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी करतील काय?

सत्तापदाचा गैरवापर आणि सत्तेच्या हक्कातून विषमतावादी विचार, अनुचित उद्गार भावना प्रकट करून लोकशाही भारत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे कोणत्या दिशेने नेऊ पहात आहेत अधीच उलट सुलट प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे राम एक वचनी एक पत्नी पुरुषोत्तम राम असेल नसेल रामाचे मंदिर भारतातच काय जगभरात निर्माण करावेत पण भारतासारख्या लोकशाही राष्ट्राची राज्यघटना संविधान हे रामकथा च्या प्रेरणेतून लिहिले गेले हा दावा अनाठाई असून खुद डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीच मनुस्मृती दहन केले हा इतिहास कोणी जरी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना सांगावा मगच बाबासाहेबांनी संविधान कसे व कशातून कोणत्या तत्त्वावर आधारित लिहिलेले हे प्रधानमंत्री महोदयाला कळेल अशीच लोक भावना व्यक्त होताना दिसते आहे ती अनाठाई नसावी असे वाटते.

भारताचा सर्वांगीण विकास करणे, नागरी समस्या सोडविणे, महागाई भ्रष्टाचाराचे निर्मूलन करणे, बेरोजगारी हठविणे, गरीब –श्रीमंत दरी दूर करणे जाती निर्मूलन करणे, अन्याय– अत्याचार संपुष्टात आणणे ,महिला– पुरुषांना सर्वकष क्षेत्रात समानसंधी देणे ,व्यक्ती स्वातंत्र्य– अभिव्यक्ती स्वातंत्र्याची बुज राखणे, लोकशाही संविधानाचे तंतोतंत पालन करणे हे पंतप्रधान म्हणून त्या त्या व्यक्तीचे लोकप्रतिनिधीचे प्रामाणिक न्यायिक कर्तव्य असते परंतु प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे अशा विषयांना बगल देऊन देव–धर्माची सांगड घालून माणसांनाच अमाणूश बनवून हुकूमी– एकाधिकारशाही राबवून आधुनिक भारताला चातुर्वर्ण्य व्यवस्थेकडे घेऊन जाऊ पाहतात –संविधाना ऐवजी त्यांना मनुस्मृति –संस्कृती जवळची कशी काय वाटते जात आणि हिंदू –धर्म बळकट करून पुन्हा स्पर्श –अस्पृश्य ,उच्च– नीच असे भेद निर्माण करून स्वातंत्र्य भारताला गुलाम कशी काय बनवू पहात आहेत हे एक कोडेच वाटत असल्याची भावना लोकसमूहातून प्रकट होताना दिसते आहे संविधान हे रामराज्याच्या प्रेरणेतून नव्हे तर जगाला शांतीचा संदेश देणाऱ्या तथागत बुद्धाच्या बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रथांतील प्रेरणा आहे हे लक्षात घ्यावे.

# क्रांतिकरांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे

**आज १७ फेब्रुवारी, स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांचा स्मृतिदिन. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे.**

वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे ( राऊत ) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रगाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी



घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले.

या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली. भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करताना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली.

इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यातिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले. मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले.

१७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्या सारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात. आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही. वस्ताद लहुजी साळवे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार दौंड जिल्हा पुणे**

# मुलींना शुल्कमाफीचे स्वागतच; परंतु मुलांना का नाही? शिक्षणामध्ये मुलां-मुलीमध्ये भेदभाव का?

**परभणी येथील एका विद्यार्थिनीने आत्महत्या केल्यानंतर राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी उच्च शिक्षण घेत असलेल्या मुलींच्या शुल्क माफीची चर्चा केली व जून २०२४ पासून महाराष्ट्रात सुमारे ८४२ अभ्यासक्रमात उच्च शिक्षण घेणाऱ्या, ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न आठ लाखांच्या आत आहे.अशा सर्व मुलींना कोणतेही शुल्क भरावे लागणार नाही.अशी घोषणा उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी केली.या घोषणेचे मनापासून स्वागतच.परंतु सरकारने फक्त मुलींनाच उच्च शिक्षणामध्ये शुल्क माफी करून मुलां-मुलीमध्ये भेदभाव निर्माण केल्याचे स्पष्ट दिसून येते.कारण मुल-मुली शिक्षणच घेत आहे ना मग असा भेदाभेद का?**

सरकारला असे तर वाटत नाही ना!की मुलांचे पालक श्रीमंत असतात व मुलींचे पालक गरीब!हा कुठला न्याय म्हणावा!समजा एखाद्या पालकाला एक मुलगा आणि एक मुलगी आहे आणि त्या पालकांचे वार्षिक उत्पन्न आठ लाखांच्या आत आहे.अशा परीस्थितीत सरकारच्या घोषणेनुसार मुलीला मोफत शिक्षण आणि मुलांसाठी पालकांनी शुल्क भरावे हा तर विद्यार्थ्यांच्या प्रति घोर अन्यायच म्हणावा लागेल. राज्यात असेही पालक आहेत की त्यांचे वार्षिक उत्पन्न दोन लाखांच्या आत आहे अशा पालकांनी आपल्या मुलांनसाठी काय करावे याचाही विचार सरकारने करायला हवा.कारण राज्यात शाळा–महाविद्यालयाच्या खाजगीकरणामुळे व अवाढव्य शुल्कामुळे मुलां–मुलींना शिकने अत्यंत कठीण झाले आहे यामुळे पालकवर्ग आर्थिकदृष्ट्या हताश होऊन खचतो.त्यामुळे शिक्षणाच्या ठिकाणी भेदभाव नकोच.एकंदरीत पहिले तर राज्यातील प्रत्येक व्यक्ती किंवा पालक आरोग्य सुविधा आणि शिक्षण या अवाढव्य खर्चामुळे छल्ली झालेला आहे.कारण खाजगी दवाखान्यांनी जनुकाय दुकानदारी खोलुन सर्वसामान्यांची जाहीर लुट सुरू केली आहे की काय असे चित्र आपल्याला दिसुन येते. त्याचप्रमाणे राज्यात शिक्षणाचा सुध्दा बाजार मांडल्याचे दिसून येते.कारण राज्यातील ९० टक्के शिक्षण संस्था ह्या राजकीय पुढाऱ्यांच्याच आहेत.आपण पहातो की नर्सरी पासून तर दहावीपर्यंत आणि दहावीपासुन उच्च शिक्षणापर्यंत मुलांना शिकवुन–शिकवुन पालकांची कंबर मोडते.दुसरीकडे कोचिंग क्लासेसची दुकानदारी वेगळी तिथेही मोठ्या प्रमाणात लुट होतांना आपण पहातो.यामुळे पालकवर्ग आर्थिकदृष्ट्या कमजोर होतो व मुलांना उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागते. परंतु मुलींच्या उच्च शिक्षणाच्या बाबतीतला सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे व याचे स्वागत सर्वच स्तरातून व्हायला पाहिजे आणि झाले सुध्दा.परंतु सरकारने उच्च शिक्षणामध्ये शुल्क माफीच्या बाबतीत मुल– मुलींमध्ये भेदभाव करून गरीब व सर्वसामान्यांना सरकारने एक मोठी खायी निर्माण केली असुन बहिण–भावामध्ये व समाजात कटुता निर्माण केली आहे. त्यामुळे एक गोष्ट चांगली लक्षात ठेवली पाहिजे की ज्या महत्त्वाच्या ठिकाणी म्हणजे आरोग्य सुविधा व शिक्षण या ठिकाणी गरीब व सर्वसामान्यांची खुली लुट होत आहे त्याठिकाणी सरकारने हस्तक्षेप करून गरीब व सर्वसामान्यांना दिलासा देण्याची गरज आहे. सरकारच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रातील उच्च शिक्षणात विद्यार्थिनींचे घटते प्रमाण रोखण्यासाठी सरकारच्या निर्णयामुळे मदत होईल.कारण महाराष्ट्रात २०२०–२१ मध्ये २०५४२५२ इतक्या मुलींनी विविध पदवी–पदव्युत्तर अभ्यासक्रमात प्रवेश घेतला होता. परंतु २०२१–२२ मध्ये ही संख्या १९२४० ने कमी होऊन २०३५०१२ इतकी नोंदली गेली आहे.यामुळे सरकारने उच्च शिक्षण घेणाऱ्या सर्व मुलींना १०० टक्के शुल्क माफीच्या निर्णय घेतला आहे हे सरकारचे योग्य आणि चांगले पाऊल आहे ताचे स्वागतच.असाच विचार सरकारने मुलांसाठी सुध्दा का केला नाही? कारण आर्थिक अडचणींमुळे मुलांप्रमाणे मुलींना सुध्दा उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागते हे सरकारने विसरता कामा नये.त्यामुळे मुलां–मुलीं मधील भेदभाव टाळून शिक्षणाकरिता सर्वांनाच एकाच प्रवाहात आणायला पाहिजे.अन्यथा विद्यार्थ्यांमध्ये असामंजस्यतेचे वातावरण निर्माण होऊ शकते व याचा विद्यार्थ्यांवर मानसिक परिणाम होवू शकतो.

महत्वाचे म्हणजे शाळा–महाविद्यालये अस्तित्वात असतांना कोचिंग क्लासेसची गरजच का पडते?याचा अर्थ स्पष्ट आहे की एकतर शाळा–महाविद्यालयामध्ये शिक्षण व्यवस्थित नसावे किंवा शाळा–महाविद्यालय याची साठगाठ कोचिंग क्लासेस सोबत असावी. राज्यात किंवा देशात शाळा–महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना व्यवस्थित व इमानदारीने शिकविले तर कोचिंग क्लासेसची गरजच भासणार नाही.परंतु कोचिंग क्लासेस सोबत शाळा–महाविद्यालयाने व सरकार यांची अवश्य साठगाठ असावी याला नाकारता येत नाही.केंद्र सरकारने कोचिंग क्लासेसवर बंदी आणल्याच्या बातम्या काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध झाल्या खऱ्या.परंतु महाराष्ट्र राज्यात याचा काहीच परिणाम दिसून आला नाही.त्यामुळे आता ही शंका आहे की मुलींना सरकारने मोफत तर शिक्षण केले परंतु कोचिंग क्लासेसचे दुकानदार त्यांच्या जवळुन कॉलेजमध्ये भरावे लागणारे शुल्क वसूल करते की काय अशी शंका वाटत आहे.उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मात्र आर्थिक अडचणींमुळे शिक्षण अर्धवट सोडावे लागणाऱ्या विद्यार्थिनींना याचा मोठा फायदा होईल ही बाब सत्य आहे.परंतु हिच परिस्थिती मुलांचीही असते तेव्हा त्यांनी काय करावे याचे उत्तर सरकार व उच्च शिक्षण मंत्रालयाने देणे अत्यंत गरजेचे आहे.सरकार हेही सांगायला विसरली नाही की मुलींच्या १०० टक्के शुल्क परताव्याचा निर्णय झाल्यास राज्याच्या तिजोरीवर एक हजार कोटींचा भार येईल अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सूत्रांनी दिली.सरकारने हे लक्षात ठेवले पाहिजे की शिक्षणासाठी भार सांगण्या पेक्षा राजकीय पुढाऱ्यांच्या, पेंशन, भत्ता, पगार,अन्य सवलती यावर सरकारच्या तिजोरीतुन यापेक्षा शंभर पट करोडो रुपयां जातो त्याचे काय? याचाही विचार सरकारने करायला हवा.सरकारने हे लक्षात ठेवायला पाहिजे की मुला–मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत ठोस भूमिका घेवून संपूर्ण शिक्षण शुल्क सरकारने आपल्या तिजोरीतुन भरावे व राजकीय पुढाऱ्यांवर होणारा खर्च कमी करावा.कारण मुलं–मुली देवाघरची फुल असते. त्यांची जोपासना आई–वडिल करतातच सोबतच सरकारनेही करावी.यातच सरकारचे, राज्याचे व देशाचे उज्वल भविष्य दिसून येईल.त्याचप्रमाणे सरकारने आरोग्य सुविधा व शिक्षण शुल्क मोफत केले तर याचे सर्वच स्तरातून स्वागत केले जाईल.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

**समया ...**

बोलावे असे काही
उंचावतीलं भुवया
प्रकाशात या पुन्हा
अशी करा किमया
जादू करतील बोल
बोला उचीत समया
लखलखीत देव्हारा
उजळे लाख समया
तापले असता दूध
घाला हळूचं शेवया
खिरीचा गोड नैवैद्य
दावा त्यांचे जावया
मैफील सोडू रसिक
लागती जसे जावया
ठेवणीतली रागदारी
दरबारी घे वाजवाया
जागे खरा कलाकार
नाट्य वठते लिलया
नवीन रंगात भिजवे
रे प्रसिद्धीच्या वलया
मावळती जाता सूर्य
निशा गोड ये उदया
रात्रीच्या गर्भात प्रभा
प्राणवायू देते हृदया

२

**दप्तर ..**

इवलसं स्मार्ट कार्ड
बाबांच्या पाकीटात
अख्खी बँक मावली
कशी त्याच्या पोटात
मस्त हलवत हात
आई जाई बाजारात
केवढालं ते सामान
घेऊनि येते घरांत
ताईडी ऑन लाईन
शॉपींग एका क्षणात
जात नाही बाजारात
मोबाईलअसे हातात
काका कडे जादूचं
पिटुकलं स्लीमसीम
अली बाबाची गुहा
खुल जा सीम् सीम
दादाचं ऑफीसटॉप
फक्त एक लॅपटॉप
घरी बसा काम करा
सगळं कसं टिपटॉप
सारं कसं झालं सोपं
शोध नवे रोज रोज
कमीकराआता माझं
दप्तराचं जड ओझं

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

## नवीन म्हाडा सोसायटी, हरंगुळ (बु.) च्या शिवजयंती अध्यक्षपदी अरविंद कांबळे तर सचिव पदी एकनाथ वडस्कर यांची निवड

लातूर : म्हाडा सोसायटी,




हरंगुळ (बु.) लातूर येथे छत्रपती शिवाजी महाराजांची ३९४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले होते. प्रमोद जोशी सभेच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीची स्थापना करून पुढील कार्यकारिणी सर्वानुमते निवडण्यात आली.

अध्यक्ष अरविंद कांबळे, उपाध्यक्ष चंद्रकांत पुंड, पांडुरंग पवार, श्रीराम गड्डेमे, सचिव- एकनाथ वडस्कर, सहसचिव अमोल माळी, कार्याध्यक्ष ज्ञानोबा मांडुमळे, अतिथी अध्यक्ष- प्रमोद जोशी, कोषाध्यक्ष महेश देशपांडे, सहखजिनदार संतोष सूर्यवंशी, जगताप सदस्य व सदस्य उपस्थित होते. चांदसाहेब शेख, बालाजी भोसले, अशोक येवले. मुरली घोडके, प्रसिद्ध प्रमुख दत्ता काळे यांची निवड करण्यात आली. अभिनंदन सोसायटीतील सर्व रहिवाशांनी नवनियुक्त कार्यकारिणीचे अभिनंदन केले.

## ग्रामपंचायत निवडणुकीसाठी मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर

लातूर, (जिमाका): राज्य निवडणूक आयोगाच्या ५ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या आदेशानुसार जानेवारी ते जून २०२४ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका, नवनिर्मित व मागील निवडणुकांमध्ये चुकीची प्रभाग रचना झाल्यामुळे निवडणुका न होवू शकलेल्या ग्रामपंचायती आणि निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर कारणांमुळे ३१ जानेवारी २०२४ अखेर रिक्त झालेल्या सदस्य, थेट सरपंच पदांच्या पोटनिवडणुकीसाठी संगणकीकृत पद्धतीने मतदार यादीचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

यासाठी २३ जानेवारी २०२४ रोजीची मतदार यादी ग्राह्य धरण्यात येणार असून प्रभाग निहाय प्रारूप मतदार यादी बुधवार, १४ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रसिद्ध होईल. १४ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी २०२४ या कालावधीत हरकती व सूचना दाखल करता येतील. २३ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रभाग निहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार लातूर तहसील कार्यालयामार्फत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# शेतकऱ्यांच्या आंदोलनास माकपचा पाठिंबा; विविध मागण्यांसाठी धरणे आंदोलन.

**माजलगाव(प्रतिनिधी)शेतीमालाला हमीभाव मिळावा इतर मागण्यांसाठी दिल्ली येथे संयुक्त किसान मोर्चाच्या वतीने शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू असून त्यास पाठिंबा देण्यासाठी १६ फेब्रुवारी रोजी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, माजलगाव शाखेच्या वतीने तहसील कार्यालया समोर धरणे आंदोलन करण्यात आले.**

त्यावेळी तहसीलदार यांन देण्यात आलेल्या निवेदनात शेतकऱ्यांच्या शेतीमालाला हमीभाव देण्याबाबत कायदा करण्यात यावा,तसेच शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी योजना लागू करावी,सामाजिक सुरक्षा उपाययोजना बळकट करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात,दलित आदिवासी यासारखे उपेक्षित समुदाय आणि महिला शेतकऱ्यांच्या जमिनीच्या हक्काचे संरक्षण करावे ,गायरान जमीन कसणाऱ्यांच्या नावे करावी, संपत्ती आणि संसाधनाचे न्याय वितरण सुनिश्चित करण्यासाठी कार्पोरेटस आणि श्रीमंतांवरील करांचे दर २०१८ पूर्वीप्रमाणे करावे ,यासह तालुक्यातील रेशनिंग समस्या,वृद्धांच्या पेन्शन बाबतीत समस्या व मंजरथ ते माजलगाव ,सुरडी ते सावरगाव या रस्त्याचे काम जलद गतीने करण्यात यावे.तसेच तेलगाव सुंदर सहकारी साखर कारखान्याने शेतकऱ्यांचे थकीत १४९ रुपयाचे बिल अदा करावे.

शालेय पोषण आहार कामगारांचे मानधनात वाढ करण्यात येऊन त्यांना संपूर्ण वर्षाचे मानधन देण्यात




यावे. यासारखे स्थानिक मागण्यांच्या समावेश आहे. हे आंदोलन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे माजलगाव तालुका सचिव कॉ.मुसद्दीक बाबा यांचे नेतृत्वाखाली करण्यात आले.यात कॉ.दत्ता डाके,मोहन जाधव,सय्यद याकूब,बळीराम भुंबे, सय्यद रजाक,सुभाष डाके,कृष्णा सोळंके,सय्यद फारूक,रामा राऊत,रावसाहेब बेद्रे,दत्ता लेंगोळे, अशोक पोपळे,रामेश्वर चिंचाने यांच्यासह युवक विद्यार्थी शेतकरी,शेतमजूर सहभागी झाले होते. दरम्यान या आंदोलनास वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा संघटक धम्मानंद साळवे यांनी पाठिंबा दिला.

# हिंदू धर्म प्रगल्भ, गहन आहे ; धर्माच्या रक्षणासाठी सर्वांनी आपसातील हेवेदावे बाजूला सारुन एकत्र यावे-परमपूजनीय विद्यानंदजी सागर बाबा

**लातूर ; (वृत्तसेवा )-हिंदू धर्म प्रगल्भ, गहन आहे. हिंदू धर्मात प्रगल्भ तत्त्वज्ञान आहे .हिंदू धर्माच्या प्रचार व प्रसारासाठी सर्वच जाती- धर्माच्या धर्म धुरंधरांनी आपसातील हेवे दावे, मतभेद बाजूला सारून एकत्र येणे गरजेचे आहे .जर आपण आप आपसात भेद करू लागलो तर भारत माता विश्वगुरू कशी बनेल ? भारत मातेची महती वाढवण्यासाठी सर्वप्रथम धर्म धुरंधरांनी एकत्र आले पाहिजे ,असे आवाहन परमपूजनीय विद्यानंदजी सागर महाराज (बाबा ) यांनी केले.**

श्री श्री राधाकृष्ण सनातन सत्संग समितीच्या वतीने मानव कल्याण एवं विश्वकल्याणासाठी लातूरमध्ये श्री श्री अष्टोत्तर शत कुंडात्मक अतिरुद्र महायाग एवं श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे .आज कथेच्या तिसऱ्या दिवशी पूजनीय बाबांनी हिंदू धर्म ,देश सेवा, साधुसंतांचे महत्त्व समर्पण भाव आदीबाबत भाष्य करीत कथा रंगतदार केली. अनेक उदाहरणे देत त्यांनी धर्माला ग्लानी येऊ नये यासाठी, धर्मकार्य ,धर्मप्रसार अव्यातपणे चालूच ठेवा असे कळकळीचे आवाहनही केले .

आपल्या आशीर्वचनात बाबा पुढे म्हणाले की ,हिंदू धर्म ,भारतीय परंपरा ,भारतीय संस्कृती अनादी अनंत आहे; तिचे रक्षण करणे हे प्रत्येकाचे परम कर्तव्य आहे .हिंदू धर्माच्या उत्थानासाठी




सगळ्यांनी समर्पित होणे गरजेचे आहे .धर्म ही बोलण्याची गोष्ट नाही तर प्रत्यक्ष आचरणाची गोष्ट आहे .तुम्ही धर्माचे रक्षण कराल तरच धर्म तुमचे रक्षण करील धर्मो रक्षिती रक्षितः जेवढे प्रेम तुम्ही तुमच्या संसारावर ,मुला-बाळावर ,पत्नींवर करता तेवढेच प्रेम तुम्ही या देशावर ,धर्मावर ,परमात्म्यावर , गुरूंवर करता का ? असा सवाल उपस्थित करून, जेवढे प्रेम तुम्ही तुमच्या संसारावर, मुलाबाळांवर करता तेवढेच प्रेम जर तुम्ही या देशावर ,धर्मावर ,साधू- संतांवर ,गुरूंवर करायचा प्रयत्न केला तर भविष्यात कोणतीही समस्या उभी राहणार नाही.

फार पूर्वी भारतात सोन्याचा धूर निघत होता असे म्हटले जायचे ;परंतु आपली धर्माप्रती ,राष्ट्राप्रती निष्ठा कमी झाली ,धर्माला ग्लानी आली तेव्हा परकीयांनी या देशावर आक्रमण केले . ही आक्रमण आपण परतवूनही लावली. भारत मातेला परम वैभव प्राप्त करण्यासाठी,या मातृभूमीला गत वैभव प्राप्त करून द्यायचे असेल तर प्रत्येकाने भारतीय बनण्याची, राष्ट्रप्रेमी नागरिक बनण्याची राष्ट्रनिष्ठा वृद्धिंगत करण्याची, हिंदू धर्माप्रती नीतांत अभिमान बाळगण्याची गरज आहे. या धर्म कार्यासाठी आपण समर्पित होण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी समर्पित व्हायला हवे असे आवाहनही परमपूजनीय विद्यानंदजी सागर बाबा यांनी आपल्या प्रवचनात केले.

बाबांना कथेमध्ये संगीत साथ करणारे साथीदार यांनी 'जहा डाल डाल पर सोनेकी बसती की चिडिया वह भारत देश है मेरा जय भारती जय भारती हे देशभक्तीपर गीत म्हटले तेव्हा कथा मंडपातील स्त्री पुरुष भक्तीसागरात तल्लीन होऊन गेले.

आज शनिवारी कथेच्या वेळी श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळा होणार आहे. श्रीकृष्ण जन्मोत्सवाचे वर्णन पूजनीय बाबा करणार असून यावेळी श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यासाठी कथास्थळी रचना करण्यात आली आहे .उत्साहात आणि भक्ती भावाने हा सोहळा साजरा करण्यासाठी भाविक भक्तांनी आपआपल्या भारतीय वेशभूषामध्ये नटून -थटून यावे. तसेच सोबत दांडिया आदी खेळाचे साहित्य आणावे आणि हा जन्मोत्सव सोहळा भक्तिमय वातावरणात साजरा करण्यासाठी उत्साहाने श्रीकृष्ण जन्म सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहनही पूजनीय बाबांनी यावेळी केले.

यावेळी विश्व हिंदू परिषदेचे प्रांताध्यक्ष संजय बारजगे तसेच ह भ प महादेव महाराज बोराडे ,जनार्दन महाराज मेटे आदींचा सन्मान देखील संयोजन समितीच्या वतीने कथास्थळी करण्यात आला. आजच्या कथेला भाविक -भक्तांची मोठी गर्दी होती .यात महिलांची उपस्थिती लक्षणीय अशीच होती.

# जळकोट तालुक्याला विकासाचे नवे मॉडेल बनविणार- क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे

लातूर, दि. १५ (जिमाका): जळकोट तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. यासाठी सिंचन, रस्ते, पायाभूत सुविधांसह विविध विकासकामांना गती देण्यात आली आहे. तसेच तालुक्यात एमआयडीसी उभारण्यास राज्य शासनाच्या उच्चस्तरीय समितीने मंजुरी दिली आहे. यामुळे तालुक्याच्या विकासाला गती मिळणार असून यापूर्वी मागास म्हणून जात असलेल्या जळकोट तालुक्याला विकासाचे नवे मॉडेल बनविण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले.

जळकोट येथील बसस्थानकाच्या नूतन इमारतीचे भूमिपूजनप्रसंगी ना. बनसोडे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जळकोट नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष मन्मथ किडे होते. माजी आमदार गोविंद केंद्रे, उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, राज्य परिवहन महामंडळाचे विभागीय नियंत्रक अश्वजीत जानराव, तहसीलदार सुरेखा स्वामी, गट विकास अधिकारी श्री. मेडेवार, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रा. श्याम डावळे यावेळी उपस्थित होते.

जळकोट येथे नवीन बसस्थानक उभारण्याची मागणी बऱ्याच कालावधीपासून करण्यात येत होती. आता बसस्थानकाची नवीन इमारत उभा राहणार असून यासाठी ५ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. १३०० चौरस फुटाच्या या बांधकामामध्ये दहा फलाट, स्वच्छतागृहे, चालक आणि वाहकांसाठी विश्रांतीगृह, महिलांसाठी विश्रांतीगृह, हिरकणी कक्ष, वाहतूक नियंत्रण कक्षासह विविध आस्थापनांसाठी दुकान गाळ्यांचा समावेश असेल. येत्या वर्षभरात बसस्थानकाचे काम पूर्ण होईल, असा विश्वास ना. बनसोडे यांनी व्यक्त केला. तसेच जळकोट येथे बस डेपो सुरु करण्याबाबत प्रस्ताव लवकरात लवकर तयार करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना




दिल्या.

जळकोट आणि उदगीर येथे विविध समाजाचे स्वतंत्र भवन उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. नुकतेच उदगीर येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे भवनासाठी १४.९६ कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. दोन्ही तालुक्यात मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरु असून ही कामे दर्जेदार आणि विहित कालावधीत होण्यासाठी सरपंच आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी पुढाकार घ्यावा. उदगीर शहरासाठी भूमिगत गटार योजनेचा प्रस्ताव मंजूर झाला आहे. जळकोट शहरातही अशाच प्रकारे भूमिगत गटार योजना राबविण्यासह पायाभूत सुविधा निर्मितीला प्राधान्य दिले जाईल. जळकोट तालुक्यात स्वतंत्र न्यायालय सुरू करण्यासाठी लवकरच जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असे ना. बनसोडे यांनी सांगितले.

राज्य शासनाने ग्रामीण भागातील रस्त्यांच्या कामांना प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी नुकत्याच झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून ग्रामीण भागातील आणखी ७ हजार किलोमीटर लांबीचे रस्ते व पूल बांधण्याचा निर्णय घेतला असल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले. तसेच जळकोट आणि उदगीर तालुक्यात जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेची कामे सुरु असून या कामांना गती देण्याबाबत संबंधित विभागाला आदेश देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

माजी आमदार गोविंद केंद्रे, उपनगराध्यक्ष मन्मथ किडे, व्यंकट पवार, श्याम डावळे, श्री. टाले यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. विभागीय नियंत्रक अश्वजीत जानराव यांनी प्रास्ताविकात जळकोट बसस्थानक नूतन इमरतीच्या प्रस्तावाबाबत माहिती दिली. प्रारंभी क्रीडा व युवक कल्याण मंत्री यांच्या हस्ते कोनशिलेचे अनावरण व भूमिपूजन करण्यात आले.

## पत्रकारांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी समिती गठित करण्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही...

**(पान १ वरुन) :** मान्यवरांसोबत अक्षरगप्पा उपक्रम राबविल्याबद्दल व पत्रकार बाबुराव रानगे यांचा सन्मान बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल केला.

पत्रकार पुरस्काराचे मानकरी - उत्कृष्ट पत्रकार संतोष पाटील तरुण भारत, उत्कृष्ट छायाचित्रकार बी डी चेचर सकाळ, उत्कृष्ट पत्रकार टीव्ही विजय केसरकर एबीपी माझा, उत्कृष्ट कॅमेरामन टीव्ही निलेश शेवाळे एबीपी माझा यांना देण्यात आला.

# लेखी आश्वासनाने आमरण उपोषन मागे

माजलगाव (प्रतिनिधी) : येथील गटविकास अधिकारी



कार्यालयासमोर मंजरथ येथील राखचाळी संदर्भात निविदा जाहीर करण्यात आली आहे.त्या निवीदेच्या सत्य प्रतीची झेरॉक्स देण्यात यावी,मंजरथ येथील राखेची निघालेली प्रेस नोटची झेरॉक्स प्रत देण्यात यावी,मंजरथ येथील राखचाळीची निघालेली निवीदा कोणत्या शासकिय कार्यालयातुन निघाली आहे संबधित कार्यालयाचे लेखी स्वरुपात माहिती देण्यात यावी.या विविध मागण्यासाठी अर्जदार आकाश उकांडे याने लेखी मागणी केली होती.सदरील माहिती या कार्यालयाने वेळेत न देता चालढकल करत होते.त्यामुळे उपोषणकर्ता आकाश उकंडे याने दि.१५ रोजी आमरण उपोषण चालू केले होते.ते आमरण उपोषण गटविकास अधिकारी यांनी लेखी आश्वासन दिल्याने आज दि.१६रोजी हे उपोषण मागे घेतले आहे.

त्या अनुषंगाने अर्जदारास कळविण्यात आले कि,संदर्भीय पत्रान्वये मागणी केलेली माहिती आपणास दि.२१/०२/२०२४रोजी कार्यालयीन वेळेत देण्यात येईल तरी आपण अमरण उपोषणापासून परावृत्त व्हावे व प्रशासनास सहकार्य करावे.अशा आशयाचे लेखी पत्र दिल्याने हे आमरण उपोषण मागे घेतले आहे. यावेळी उपोषणकर्ता आकाश उकंडे सह सचिन उजगरे,युवा आंदोलनाचे विवेक जाधव,अशोक ढगे व पंचायत समितीचे कर्मचारी उपस्थित होते.

# *दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाच्या बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'निरोप व शुभेच्छा समारंभ 'संपन्न*

दयानंद शिक्षण संस्था सभागृहात इ. बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी



निरोप व शुभेच्छा समारंभ आयोजित करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. राजाराम पवार, दयानंद शिक्षण संस्था कोषाध्यक्ष प्रमुख पाहुणे मा.संजयजी बोरा, तसेच कु. सृष्टी जगताप गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड, दयानंद विधि महाविद्यालयाच्या डॉ. शुभांगी पांचाळ, दयानंद वाणिज्य महाविद्यालय विभाग प्रमुख डॉ.मनीषा अष्टेकर, दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय समन्वयक प्रा. सुभाष मोरे, सी.ए .सी. एस. विभाग प्रा. सुदर्शन लड्डा उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व स्वागत गीताने झाली. प्रा.सुभाष मोरे यांनी बारावी विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वी घ्यावयाची काळजी व करिअर विषयी मार्गदर्शन प्रस्तावनेत केले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या भाषणातून सर्वोत्कृष्ट महाविद्यालय ,शिक्षक व वर्गमित्र व आठवणी यांना उजाळा दिला. त्यांच्या भाषणांतून त्यांनी त्यांचा सर्वांगीण विकास झाला असे मनोगत व्यक्त केले . दयानंद शिक्षण संस्था कोषाध्यक्ष मा.संजयजी बोरा यांनी विद्यार्थ्यांना तणाव विरहित परीक्षा दिली पाहिजे असे मार्गदर्शन केले. प्रा.सुदर्शन लड्डा यांनी सप्त गुणांचा विकास व्यावसायिक शिक्षण सी.ए.,सी.एस.सी.एम.ए.व विविध कोर्स बद्दल माहिती दिली. तसेच पदवी अभ्यासक्रमाबद्दल सखोल मार्गदर्शन डॉ. मनीषाअष्टेकर यांनी केले. अशक्य असे काही नाही असे आपल्या अनुभवातून कु. सृष्टी जगतापने सांगितले व भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कायद्याच्या शिक्षणाविषयी ,न्यायदानाविषयी माहिती व असणाऱ्या संधी डॉ. शुभांगी पांचाळ यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ.राजाराम पवार यांनी विविध करिअर विषयी सखोल मार्गदर्शन केले व कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन अकरावीच्या विद्यार्थ्यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा.सुवर्णा कारंजे यांनी केले.कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी ,विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पत्रकार ईश्वर बद्दर यांच्यावरील खोटा गुन्हे तत्काळ मागे घेण्यात यावीत

लातूर : रेणापूर तालुक्यातील पत्रकार ईश्वर बद्दर यांच्यावर दाखल करण्यात आलेले खोटा गुन्हे तत्काळ मागे घेऊन त्यांच्यावर खोटा गुन्हा दाखल



करणार्यावरच तत्काळ गुन्हा दाखल करावा अन्यथा २२ फेब्रूवारी २०२४ रोजी सकाळी ११.०० वा रेणापूर येथील तहसिल कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा व्हाईस ऑफ मिडीया रेणापूरच्यावतीने तहसिलदारांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आलेला आहे.

३० जानेवारी २०२४ रोजी पोहरेगाव येथील सूर्यकांत मारुती मोरे यांनी माझा पूतन्या गणेश मोरे यांना शारीरिक व मानसिक त्रास देऊन आत्महत्येस प्रवृत्त केल्याबद्दल लातूर येथील पोलीस अधिक्षकाकडे कार्यवाही करण्याची माणगी केली होती. या निवेदनात रेणापूर येथील पत्रकार ईश्वर बद्दर यांच्या नावाचाही उल्लेख करण्यात आलेला असल्यामुळे या प्रकरणाबाबत योग्य ती चौकशी करून दोषीवर गुन्हे दाखल करावीत अशा मागणीचे निवेदन व्हाईस ऑफ मिडीया रेणापूरच्यावतीने देण्यात आले होते. या बाबत कसलीही चौकशी न करता १३ फेब्रूवारी २०२४ रोजी ईश्वर बद्दर यांच्याविरूध्द खोटा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे पत्रकार ईश्वर बद्दर यांच्यावर खोटा गुन्हे दाखल करणार्या फिर्यादी व पोलीसावर गुन्हा दाखल करण्यात यावा अन्यथा २२ फेब्रूवारी २०२४ रोजी सकाळी ११.०० वा आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा व्हाईस ऑफ मिडीया रेणापूरच्यावतीने देण्यात आलेला असून या निवेदनावर व्हाईस ऑफ मिडीयाचे रेणापूर तालुकाध्यक्ष पत्रकार विठ्ठल कटके, कार्याध्यक्ष रफीक शिकलकर, सरचिटणीस सिध्दार्थ चव्हाण,सदस्य मधुकर गालफाडे यांच्यासह कोंडीराम काळे, निजाम शेख, अपसिंगेकर, कटके आदींच्या स्वाक्षर्या आहेत.

## विकसित देशासाठी विद्यार्थ्यांतील संशोधकवृत्ती वाढावी कॉक्सिट कनिष्ठ महाविद्यालयातील बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

लातूर, – आपला भारत देश हा सध्या



विकसनशील आहे. देशाला विकसित देश म्हणून पाहायचे असेल तर विद्यार्थ्यांनी आपापल्या क्षेत्रात संशोधन करून त्याचा देशाच्या विकासासाठी लाभ करून द्यावा, यासाठी सरकारनेही संशोधक विद्यार्थ्यांना पाठबळ द्यावे, तर विकसित देशाच्या यादीत भारत येण्यास वेळ लागणार नाही, असा विश्वास रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. एम. आर. पाटील यांनी व्यक्त केला.

येथील कॉक्सिट ज्युनिअर महाविद्यालयातील बारावी विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा देऊन त्यांना महाविद्यालयाच्यावतीने निरोप देण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानावरून डॉ. एम. आर. पाटील बोलत होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. बी. एल. गायकवाड, प्राचार्या तबस्सूम मोमीन, डॉ. सुमेध कावळे उपस्थित होते.

यावेळी डॉ. पाटील म्हणाले, भारत हा विकसनशील देश आहे. या देशाला विकसित देश म्हणून पाहायचे असेल तर विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारून विकासाच्या संधीत परिपूर्ण अभ्यासातून, आत्मविश्वासाने आपली बौध्दिक कुवत सक्षम करण्याची गरज आहे. तंत्रज्ञानाच्या वापरानेच देशाचीही प्रगती होऊन देश विकसित होण्यास हातभार लागेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त करून बारावीच्या परीक्षांना विद्यार्थ्यांनी भरपूर अभ्यास करून आत्मविश्वासाने सामोरे जावे, असे सांगून परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक प्राचार्या मोमीन यांनी केले. यावेळी त्यांनी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करण्यासाठी विविध पध्दती, मार्गदर्शन यांचा अवलंब केला जातो, असे सांगून महाविद्यालयाच्या गुणवत्तेचा उंचावता आलेख सादर केला. डॉ. गायकवाड यांनी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन प्रा. नवगिरे यांनी केले. आभार प्रा. एस. एस. भोसले यांनी मानले. यावेळी प्रा. जितेंद्र बनबोडे, प्रा. जी, व्ही. माने, प्रा. एस. एम. सुगावे, प्रा. चव्हाण, प्रा. स्मिता पाटील उपस्थित होते.

## मोदीजींनी राबविलेली नवीन शिक्षणपध्दती देशाला प्रगतीथावर घेऊन जाईल

लातूर : भारत देश हा तरूणाचा देश म्हणून प्रसिद्ध आहे. भारताचे तरुण जगामध्ये सर्वाधिक हुशार असल्याची माहिती जागतिक सर्वेमधून समोर आलेली आहे. जगामध्ये बराक ओबामा, स्टिव्ह जॉब, भारतीय उद्योजक राममूर्ती, देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी व अनेक भारतीय जगातील अनेक महत्त्वाच्या घटनात्मक पदावर कार्यरत आहेत. या प्रभावी उद्योजक व नेत्यांनी आपल्या बौध्दिक संपदेच्या जोरावर संशोधकांनी संशोधन करून शक्ती व संपत्ती मिळविली तर राजकीय क्षेत्रातील नेत्यांनी बौध्दिक संपदेच्या जोरावर अतुलणीय कार्य केले. त्यातच देशाचे पंतप्रधान मोदीजींनी शिक्षण पध्दतीमध्ये आमुलाग्र बदल घडवून नवीन शिक्षण पध्दती आणण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे ही नवीन शिक्षणपध्दती भारत देशाला प्रगतीपथावर घेऊन जाईल असे प्रतिपादन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

यावेळी ते विद्यार्थी सहाय्यक मंडळ, लातूर व शिवाजी महाविद्यालय रेणापूर यांच्या सुंयक्त विद्यमाने आयोजित व्यक्तिमत्त्व विकास चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षीय समारोपात बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाला ज्येष्ठ विचारवंत तथा महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे कुलगुरू, विद्यार्थी सहाय्यक मंडळाचे अध्यक्ष तथा माजी खा.डॉ.जनार्दन वाघमारे, विद्यार्थी सहाय्यक मंडळाचे सचिव डॉ.नागनाथ मोटे, जयक्रांती महाविद्यलयाच्या माजी प्राचार्या डॉ.कूसूमताई पवार–मोरे, प्राचार्य डॉ.आर. एस.अवस्थी, उपप्राचार्य रमाकांत घाडगे, उपप्राचार्य नागरगोजे, प्रा.सतीश यादव, ज्येष्ठ साहित्यीक फ.म.शहाजिंदे, विद्यार्थी सहाय्यक मंडळाचे बालाजी पळसकर, विक्रम कदम, पांडुरंग आडसूळ, डॉ.मन्मथ भातांब्रे, सुनिता गिरवलकर आदी मान्यवर उपस्थित हाते.

यावेळी पुढे बोलताना माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले की, सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. त्यामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे रोबोटेकच्या माध्यमातून अनेक कामे केली जात असल्यामुळे पुढच्या कालावधीमध्ये महाविद्यालयीन शिक्षणही ऑनलाईनच्या माध्यमातून घरातूनच घेता येणार आहे. महात्मा बसवेश्वरांनी १२ शतकामध्ये चांभाराच्या मुलीचा ब्राम्हणाच्या मुलाशी विवाह करून क्रांतिकारी कार्य केले.

# शाश्वत शेतीसाठी शेतकऱ्यांनी नवतंत्रज्ञानाचा अवलंब करावा – जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

**लातूर, (जिमाका) : शेतकऱ्यांनी नवतंत्रज्ञानाच्या आधारे शेतीतील उत्पादन खर्च कमी करून गुणवत्तापूर्ण उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतीतून उत्पन्नाचा शाश्वत स्त्रोत निर्माण होईल. यासोबतच शेतकऱ्यांनी एकत्र येऊन स्वतःच्या शेतमालाची ब्रॅण्डिंग, मार्केटिंग स्वतः करण्यावर भर द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.**

शाश्वत शेती उपक्रमाअंतर्गत एडीएम ॲग्रो इंडस्ट्रीज इंडिया प्रा. लि, विकास ॲग्रो फार्मर प्रा. कंपनी लि. आणि लातूर कृषि महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नागझरी येथे जागतिक कडधान्य दिनानिमित्त आयोजित 'शेतकरी परिसंवाद' कार्यक्रमात जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या.

माजी कृषी सहसंचालक डॉ. दिनकर जाधव, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शिवसांब लाडके, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे, प्रा. डॉ. अरुण गुट्टे व प्रा.डॉ. वसंत सूर्यवंशी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

लातूर हा देशातील सर्वात मोठा सोयाबीन उत्पादक जिल्हा असून तूर आणि हरभरा या कडधान्यांचे दर निश्चित करण्यासाठी लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा फार मोठा वाटा आहे. शेतीतील महिलांचा टक्का वाढविण्यासाठी सातबाऱ्यावर महिलांचे नावे येणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी नमूद केले. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी विविध क्षेत्रात प्रगतीचे टप्पे गाठले आहेत.




शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या चळवळीच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी प्रगती साधली आहे. यामध्ये आणखी खूप काम करण्यास वाव असल्याचे त्यांनी सांगितले.

कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी शाश्वत शेतीच्या विकासामध्ये पशुधनाचे महत्व विशद केले. पारंपारीक शेतीला नवतंत्रज्ञानाची जोड देऊन शेतकऱ्यांनी आत्मनिर्भर होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. लाडके यांनी शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी कृषि विभाग कायम शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा असल्याचे सांगून शेतकऱ्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

प्रमुख मार्गदर्शक प्रा. अरुण गुट्टे व प्रा. डॉ. वसंत सूर्यवंशी यांनी उपस्थित शेतकऱ्यांना तूर व हरभरा या कडधान्य पिकाचे महत्त्व, पीक फेरपालट व तूर, हरभरा या पिकांवर येणाऱ्या रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पंचसूत्रीचा अवलंब करून आपल्या उत्पादनात वाढ करण्याबाबत मार्गदर्शन केले. एडीएम ॲग्रोचे वाणिज्य विभाग प्रमुख एम.बी. गाजरे यांनी एडीएम कडून सोयाबीन सोबतच तूर आणि हरभरा या पिकांच्या मूल्यसाखळी संवर्धनासाठी प्रयत्न सुरु असल्याचे सांगितले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. दिनकर जाधव म्हणाले, लातूरची तूर ही ओळख कायम ठेवण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रयत्न केले पाहिजेत. येणाऱ्या काळात सोयाबीनचे क्षेत्र वाढून त्याची मोठी बाजारपेठ विकसित होईल. यामध्ये शेतकऱ्यांनी टिकून राहण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करताना अधिक उत्पादनक्षम वाणांचा प्रचार व प्रसार करावा, असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी प्रगतशील शेतकरी प्रकाश झुंजे पाटील, श्रीराम साळुंखे, डॉ. विजय भामरे, दिलीप राऊत, अनंत गायकवाड, विकास फार्मर प्रो. कंपनी चे संचालक विलास उफाडे तसेच एडीएमचे अमोल ढवण, अंजली रितू, राम सिनगारे, गोपाळ तळेकर, एडीएम आणि विकास ॲग्रोचे सहकारी वृंद व नागझरी, हरंगुळ, टाकळी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दयानंद माने यांनी केले.

# आज 'स्थळ' चित्रपटाचा शो : १६ जागतिक चित्रपटाचे प्रदर्शन लातूर फिल्म फेस्टिवलला चांगला प्रतिसाद

**लातूर (प्रतिनिधी): महाराष्ट्र शासन, विलासराव देशमुख फाउंडेशन, पुणे फिल्म फाउंडेशन आणि अभिजात फिल्म सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या दुसऱ्या लातूर आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला शुक्रवारी अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. महोत्सवाचा आज दुसरा दिवस होता. तरुण रसिकांनी आज आवर्जून हजेरी लावत आठ चित्रपटांचा आनंद घेतला. उर्वरित दोन दिवसात 'पीव्हीआर' थिएटरमध्ये १६ चित्रपट दाखवले जातील. विशेषतः जागतिक सिनेमा विभागात काही उल्लेखनीय चित्रपटांचा यामध्ये समावेश आहे. गुरुवार, १५ फेबुवारी २०२४ रोजी सायंकाळी फिल्म फेस्टिवलचे उद्घाटन पुणे फिल्म फेस्टिवलचे अध्यक्ष व ख्यातनाम दिग्दर्शक श्री जब्बार पटेल व राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक मंत्री व लातुरचे आमदार श्री अमितभैय्या देशमुख यांच्या हस्ते व इतर पाहूण्यांच्या उपस्थितीत झाले. उद्घाटन समारंभानंतर वर्ल्ड सिनेमा विभागातील 'ब्लागाज लेसन' (बल्गेरिया) हा चित्रपट दाखविण्यात आला. मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या शो ला उपस्थिती चांगली होती.**

महाराष्ट्र शासन, विलासराव देशमुख फाऊंडेशन, पुणे फिल्म फाऊंडेशन व अभिजात फिल्म सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने हा इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल पीव्हीआर थिएटर मध्ये सध्या सुरू आहे. जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट रसिकांपर्यंत पोहोचवणारा हा उत्सव आहे. फेस्टिवल १८ वर्षांवरील सर्वांसाठी खुला असून नि:शुल्क आहे. जब्बार पटेल यांची भेट पुणे फेस्टिवल चे प्रमुख सुप्रसिद्ध दिग्दर्शक श्री जब्बार पटेल, तसेच निवड समिती चे श्री समर नखाते व पुणे फेस्टिवल चे उप संचालक श्री विशाल शिंदे आदींनी आज फेस्टिवल



स्थळी भेट दिली. जब्बार पटेल यांनी रसिकांशी चर्चा केली.

आठ चित्रपटांचे प्रदर्शन :

दुसऱ्या दिवशी शुक्रवारी ग्लोबल सिनेमातील पाच, भारतीय भाषा विभागात दोन तर एक माहितीपट दाखवण्यात आला. यामध्ये पुढील चित्रपटांचा समावेश होता. रोपवॉकर मेमरीज (इराण– दिग्दर्शक हमीद राजाबी), सिरा (बुर्किनाफासो –फ्रान्स– जर्मनी –सेनेगल – दिग्दर्शक पोलाईन ट्राओरे), द चेंबरमेड (स्लोव्हाकिया– झेक रिपब्लिक – दि. मारियाना एंजल), सिस्टर एंड सिस्टर (पनामा – दि. कटिया झुनीगा), अकिलिस ( इराण – दि. फरहाद देलाराम),लिबरेशन पार्ट वन (तमिळ, दिग्दर्शक वेट्री मारन), इनव्हिजीबल विंडोज (मल्याळम, दिग्दर्शक डॉक्टर ब्रिजकुमार दा शनिवारचे चित्रपट आज फिल्म फेस्टिवल मध्ये जागतिक पातळीवर गाजलेला जयंत सोमालकर दिग्दर्शित 'स्थळ' हा मराठी चित्रपर दाखवला जाणार आहे. याशिवाय उर्वरित चित्रपट पुढीलप्रमाणे आहेत. टोटेम (मेक्सिको– दि. लीला एव्हिलेस), द पाथ ऑफ एक्सलन्स (फ्रान्स दि. फ्रेडरिक मर्माऊड), अ रोड टू अ व्हिलेज ( नेपाळ – दिग्दर्शक नबीन सुब्बा), सौला (अल्जेरिया– दिग्दर्शक सलाह इसाद), वुमन ऑन द रूफ (पोलंड – दि. ना जडोस्का) वरील चित्रपट जागतिक चित्रपट विभागातील आहेत. याशिवाय भारतीय भाषेतील 'लव्ह इज फॉर ऑल' (तमिळ, दि. जयप्रकाश राधाकृष्णन) तसेच द गोल्डन थ्रेड (दिग्दर्शिका– निष्ठा जैन) हा माहितीपट दाखविला जाईल. फिल्म फेस्टिवल मध्ये दाखवले जाणारे चित्रपट कलात्मक व दर्जेदार असे असतात. जगण्याचे नवे भान देणारे आशयघन चित्रपट पाहण्यासाठी रसिकांनी अवश्य यावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# मूलभूत संशोधनाला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड द्यावी – रमेशजी बियाणी

लातूर – डॉ.तौर यांनी ह्युगो डी व्रीज या अनुवंशशास्त्रज्ञाच्या जयंतीप्रसंगी दयानंद विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या उत्साहाचे कौतुक केले.आपण शिकत असणाऱ्या वैज्ञानिक सिद्धांताबरोबरच तो सिद्धांत मांडणारा वैज्ञानिक व त्याचा जीवनगौरव अशा उपक्रमातून केला जातो,ज्यामुळे आपसूकच विज्ञानविषयक जनजागृती घडते असे सांगितले.

दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.१६ फेब्रूवारी २०२४ रोजी जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने वैज्ञानिक 'ह्युगो डी व्रीज' यांची १७६ वी जयंती साजरी करण्यात आली.स्वारातीम विद्यापीठातील ललित कला आणि प्रयोगजीवी कला संकुलाचे संचालक प्रा.डॉ.पृथ्वीराज तौर,दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेशजी बियाणी आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांनी कार्यक्रमाची सुरुवात वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली.वैज्ञानिक ह्युगो डी व्रीज यांची विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील कारकीर्द बी.एस्सी.बी.टी. प्रथम वर्षाची विद्यार्थीनी जानवी अंबर यांनी प्रकाशझोतात आणली.



प्रस्तावनेत डॉ.कोमल गोमारे यांनी विभागाद्वारे आजपर्यंत विविध ८७ वैज्ञानिकांची जयंती साजरी करण्यात आली असून महाविद्यालयातील एक आदर्श उपक्रम म्हणून याकडे पाहिले जाते व सर्व विभागातील शिक्षक व विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित राहून प्रोत्साहन वाढवितात त्याबद्दल आभार मानले.

संस्थेचे सचिव रमेश बियाणी यांनी एखाद्या सैनिकाप्रमाणे तत्पर राहून आपले कार्य करणारे बरेचशे वैज्ञानिक उपेक्षितच राहतात.जैवतंत्रज्ञान विभागाचा वैज्ञानिकांची जयंती साजरी करून त्यांच्या कार्याचा प्रसार करण्याचा हा स्तुत्य उपक्रम असल्याचे सांगितले.जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र हे वेगाने वाढणारे संशोधन क्षेत्र आहे व विभागातील विद्यार्थी नक्कीच यशोशिखरावर पोहोचतील असेही ते म्हणाले.

ह्युगो डी व्रीज हे डच वनस्पतिशास्त्रज्ञ आणि पहिल्या अनुवंशशास्त्रज्ञांपैकी एक होते.ग्रेगर मेंडेलच्या कार्याबद्दल अनभिज्ञ असताना १८९० च्या दशकात जनुकांची संकल्पना सुचवणे,आनुवंशिकतेचे नियम पुन्हा शोधणे, उत्परिवर्तन हा शब्दप्रयोग सादर करणे आणि उत्क्रांतीचा उत्परिवर्तन सिद्धांत विकसित करणे यासाठी ते प्रामुख्याने ओळखले जातात.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड व उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमासाठी जैवतंत्रज्ञान विभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,विविध विभागाचे विद्यार्थी प्रतिनिधी प्रामुख्याने उपस्थित होते.तसेच विद्यार्थ्यांच्या जैवतंत्रज्ञान मंचची उपाध्यक्ष व विद्यार्थीनी प्रतिनिधी पर्णवी ढवारे,विद्यार्थी संसद प्रतिनिधी विद्या नागटिळक,संगणकशास्त्र विभाग प्रतिनिधी हराळे आश्विन,वनस्पतीशास्त्र विभाग प्रतिनिधी टोंपे प्रतीक्षा,विदुला राजमाने जैवतंत्रज्ञान विभाग प्रतिनिधी वृषाली पवार,प्रकाश गवळी,ऋतुजा शितोळे,विभागातील बी.एस्सी. प्रथम,द्वितीय व तृतीय वर्षाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## 'खेलो इंडिया'मध्ये सहभागी होण्यासाठी २० फेब्रुवारीपर्यंत नाव नोंदविण्याचे आवाहन

लातूर, (जिमाका): 'मायभारत'द्वारे खेलो इंडिया टॅलेंट हंट प्रत्येक तरुण खेळाडूला त्यांचे ध्येय गाठण्यासाठी आवश्यक असलेली साधने उपलब्ध करुन देवून प्रतिभेचे संगोपन करण्यासाठी समर्पित आहे. खेलो इंडिया टॅलेंट हंट हा भारताच्या क्रीडा विभागातील एक महत्वाचा उपक्रम आहे. ज्याचा उद्देश विविध विषयांमधील युवा क्रीडा प्रतिभा शोधणे आणि त्यांचे पालन पोषण करणे आहे. हा कार्यक्रम तळागाळातील खेळाडूंना ओळखण्यासाइी त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आणि त्यांना त्यांच्या क्षमतांचे प्रदर्शन करण्यासाठी व्यासपीठ प्रदान करण्याचा प्रयत्न करतो.

खेलो इंडिया कार्यक्रमामध्ये सामील होण्यासाठी २० फेब्रुवारी, २०२४ पर्यंत या उपक्रमांतर्गत शाळांतील विद्यार्थ्यांची नोंदणी https://mybharat.gov.in/kheloIndia या लिंकवर करण्यात यावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केले आहे

## *बाभळगाव येथील पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या १९ व्या सत्राचे दीक्षांत संचलन उत्साहात*

लातूर, (जिमाका) : बाभळगाव येथील पोलीस प्रशिक्षण केंद्राचा



१९ वा दीक्षांत संचालन सोहळा गुरुवारी उत्साहात पार पडला. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. व्ही. पाटील यांची यावेळी उपस्थिती होती. प्रशिक्षण काळात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना यावेळी चषक, सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.

पोलीस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य तथा अपर जिल्हा पोलीस अधीक्षक अजय देवरे, केंद्रीय राखीव पोलीस दलाचे सहायक आयुक्त श्री. वाघचौरे, प्रशिक्षणार्थी आयपीएस अधिकारी नवदीप अग्रवाल यावेळी उपस्थित होते.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. पाटील यांनी प्रारंभी परेड निरीक्षण केले. त्यानंतर सर्व प्रशिक्षणार्थींना पोलीस प्राचार्य अजय देवरे यांनी कर्तव्य आणि जबाबदारीबाबत शपथ दिली.

***गुन्ह्याचा तपास करताना कायद्याचा अभ्यास हवा – श्री. पाटील***

प्रशिक्षण पूर्ण झालेल्या पोलीस जवानांना प्रत्यक्ष कर्तव्य बाजविताना आपल्या प्रशिक्षण कालावधीत आत्मसात कौशल्याचा, शिकलेल्या कायद्यांचा उपयोग होतो. सध्या गुन्ह्यांचे स्वरूप बदलत असून त्याअनुषंगाने नवीन कायदेही तयार होत आहेत. कोणत्याही गुन्ह्याचा तपास करताना त्यासंबंधी असलेल्या कायद्याचा अभ्यास असल्यास तपासात त्रुटी राहत नाहीत. त्यामुळे प्रशिक्षणार्थी पोलीस जवानांनी प्रत्यक्ष कर्तव्य बजावताना वेळोवेळी नवीन येणाऱ्या कायद्यांचा अभ्यास करावा, असे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. व्ही. पाटील यांनी सांगितले.

***प्रशिक्षण केंद्रातून आदर्श, संवेदनशील पोलीस घडविण्याचा प्रयत्न – अजय देवरे***

बाभळगाव येथील पोलीस प्रशिक्षण केंद्र २००६ पासून कार्यान्वित करण्यात आले असून आतापर्यंत १८ सत्रांमध्ये ८ हजार ३४० प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच १९ व्या सत्रात नवी मुंबई, मिरा भाईंदर, नागपूर आणि पिंपरी चिंचवड येथील ९०९ पोलीस जवानांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. या केंद्राच्या माध्यमातून आदर्श आणि संवेदनशील पोलीस घडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे पोलीस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य अजय देवरे यांनी प्रशिक्षण केंद्राचा अहवाल सादर करताना सांगितले.

***उत्कृष प्रशिक्षणार्थींचा गौरव***

पोलीस प्रशिक्षण वर्गात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रशिक्षणार्थींचा सन्मान यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. गोळीबार, बाह्य वर्गामध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल साहेबराव बाळासाहेब गाढवे (नवी मुंबई), बाह्यवर्गात द्वितीय क्रमांकासाठी प्रकाश हेतराम उईके (नागपूर), आंतरवर्ग प्रथम योगेश बाळू कदम (मिरा भाईंदर), आंतरवर्ग द्वितीय भीमराव आप्पासाहेब घोरपडे (मिरा भाईंदर), कमांडो वर्ग प्रथम रमेश रामलाल मडावी (मिरा भाईंदर) यांचा चषक देवून सन्मान करण्यात आला. तसेच सर्वोत्कृष्ट प्रशिक्षणार्थी म्हणून साहेबराव बाळासाहेब गाढवे यांना गौरविण्यात आले.

पोलीस प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थींनी यावेळी आदिवासी नृत्य, लेझीम नृत्य सादर केले. तसेच लातूर पोलीस दलाच्या जवानांनी कमांडो प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांना आपल्या सामर्थ्याचे दर्शन घडविले. प्रशिक्षणार्थी पोलीस जवानांनी परेड निष्क्रमण संचलन करीत प्रशिक्षण केंद्राचा निरोप घेतला. पोलीस प्रशिक्षण केंद्राचे उप प्राचार्य पोलीस निरीक्षक व्ही. बी. पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले..

## सुप्रसिद्ध गायक महेश काळे यांच्या स्वरवर्षावात लातूरकर चिंब !

लातूर, (जिमाका): राज्य शासनाचा पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग आणि जिल्हा प्रशासनाच्यावतीने आयोजित महासंस्कृती महोत्सवाचा समारोपीय कार्यक्रम आज दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावरील कै. नटवर्य श्रीराम गोजमगुंडे रंगपीठ येथे पार पडला. सुप्रसिद्ध गायक महेश काळे यांच्या 'सूर निरागस हो...' या कार्यक्रमाने महोत्सवाचा समारोप झाला. यावेळी त्यांनी सादर केलेल्या एकाहून एक सरस आणि अवीट गीतांच्या स्वरधारांमध्ये लातूरकर चिंब भिजून गेले. यावेळी सादर झालेल्या बहारदार गीतांमुळे आणि त्याला मिळालेल्या तितक्याच दमदार प्रतिसादामुळे समारोपीय सोहळा संस्मरणीय ठरला.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग आणि जिल्हा प्रशासनाचा महासंस्कृती महोत्सव आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्यावतीने आयोजित विभागीय १०० वे नाट्य संमेलनाच्या निमित्ताने लातूर जिल्ह्यातील रसिकांना पाच दिवसाची सांस्कृतिक मेजवानी मिळाली. यानिमित्ताने विविध दर्जेदार कार्यक्रम लातूरकरांना पाहायला मिळाले. या उपक्रमाचा समारोपही तितकाच दर्जेदार आणि संस्मरणीय झाला. महेश काळे यांचे स्वर कानात साठविण्यासाठी मोठ्या संख्येने जमलेल्या लातूरकरांसाठी आजचा दिवस पर्वणी ठरला. शास्त्रीय संगीतातील जवळपास १८ राग एकत्र गुंफलेल्या रागमालेने महेश काळे यांनी कार्यक्रमाची सुरुवात केली. शास्त्रीय गायन, भक्तिगीते, नाट्यगीतांच्या माध्यमातून रंगलेल्या या स्वर मैफिलीमध्ये प्रेक्षकही तल्लीन होवून गेले. या प्रेक्षकांनाही आपल्या गायनात सहभागी करून घेत महेश काळे यांनी संपूर्ण वातावरण संगीतमय केले.

सूर निरागस हो..., घेई छंद मकरंद..., हे सुरांनो, चंद्र व्हा चांदण्याचे कोष माझ्या प्रियकराला पोचवा... यासारखी एकाहून एक श्रवणीय गीते सादर करणाऱ्या महेश काळे यांच्या प्रत्येक गीताला प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर – ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894